## वसुलीसाठी नियुक्त एजन्सीबाबत अटी व शर्ती

१. वसुली एजंट/एजन्सी वैयक्तिक, नोंदणीकृत भागीदारी किंवा प्रोप्रायटर फर्म, कॉपोरेट संस्था, शासकीय/निमशासकीय संस्था असली पाहिजे.

२. सदर संस्थांच्या व्यवस्थापकीय बोर्डवर चार्टर्ड अकौंटंट एम.बी.ए. चार्टर्ड इंजिनिअर्स, कायदेशीर व्यवसायिक, निवृत्त पोलिस कर्मचारी इत्यादी व्यावसायिक असावेत.

३. एजन्सीला दोन सार्वजनिक क्षेत्रातील बँकामध्ये एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी वसुली एजन्सी म्हणून कामाचा अनुभव असला पाहिजे.

४. . एजन्सीचे प्रवर्तक/कर्मचारी यांनी कर्जवसुलीसाठी रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.

५. . एजन्सी कमिशन/फी/खर्च इत्यादी ठरविण्याचा अधिकार बँकेस राहील.

६. निवडण्यात येणा-या एजन्सीने बँकेच्या कायदा विभागाने मंजूर केलेल्या कराराच्या मसुदया नुसार करार करावा लागणार आहे.

७. निवडण्यात येणा-या . एजन्सी तथा त्याच्या कर्मचा-यांची केंद्र आणि स्थानिक कायदया अंतर्गत सर्व वैधानिक आवश्यकतांचे पालन केले असल्याचे सुनिश्चित केले पाहिजे.

८. रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एजन्सीने कर्ज वसुलीची कार्यवाही केली पाहिजे.

९. . एजन्सीची नियुक्ती १ वर्षाच्या कालावधीसाठी राहील आणि कामगिरीच्या आधारे पुढील नुतनिकरण करण्यात येईल.

१०. सील बंद प्रस्ताव बँकेच्या क्षेत्र/वसुली विभागाकडे दि. १४/०१/२०२५ रोजी पर्यत सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वा. याकालावधीत स्वीकारण्यात येतील.

११. शासनाचे नोंदणीप्रमाणपत्र/शॉप ॲक्ट लायसन्स्, इन्कम टॅक्स व जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र , आयकर रिटर्न दाखल केल्याचा पुरावा इ. असणे आवश्यक आहे.

१२. संबंधित एजन्सीला सरफेसी कायदा २००२ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १०७ अन्वये वसुलीचे कामकाज करावे लागेल.

१३. सर्व्हिस चार्ज, इन्कमटॅक्स ॲक्ट मधील टी.डी.एस. व जी.एस.टी. बाबतच्या तरतूदी विचारात घेवून कमिशन/फी अदा केली जाईल. तसेच शासनाचे कायदयानुसार वेळोवेळी होणारे बदल नियुक्त एजन्सीस बंधनकारक राहतील.

१४. केवळ सर्वात कमी रकमेचे दरपत्रक आहे म्हणून मान्य करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही सदर एजन्सीला असणारा अनुभव व मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता विचारात घेवून एजन्सीची निवड केली जाईल.

१५. बँकेने संमत केलेल्या विहित नमुन्यात करार करणे बंधनकारक राहिल.

१६. प्रस्ताव सुचनामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती पुर्ण करणारी एजन्सी प्रस्ताव दाखल करण्यास पात्र होवू शकेल पात्र एजन्सीने प्रस्तावासमवेत आवश्यक कागदपत्रे परिशिष्टासह दाखल करावेत.

१७. वरील अटी व शर्ती मध्ये वाढ/कमी दुरुस्त करण्याचा अथवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी